Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052
-------------------------------------------------------------------------------------------

# UNIT 7
# SOCIO - POLITICAL PHILOSOPHY

## प्रकरण सातवे
## सामाजिक आणि राजकीय तत्त्वज्ञान



या प्रकरणात पुढील सामाजिक आणि राजकीय संकल्पनांचे स्वरुप पाहणार आहोत.

### 1. सामाजिक आणि राजकीय संकल्पना :

1)हक्क
2)कर्तव्य
3) कर्तव्यता (कर्तव्यतेचे बंधन)
4)स्वातंत्र्य
5)न्याय.

### 2.शिक्षेचे सिध्दान्त :

प्रस्तावना :

सामाजिक आणि राजकीय संकल्पनांपैकी आपण 1) हक्क आणि 2) कर्तव्य यांचे स्वरुप यापूर्वीच प्रकरण पाचव्यातील मूलभूत नैतिक सिध्दान्तात पाहिले आहेच.ते येथे वाचावे.आता आपण बांधिलकी,स्वातंत्र्य आणि न्याय यांचे स्वरुप पाहू.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

## 3) कर्तव्यता (कर्तव्यतेचे बंधन) (Obligation)

काय करावे ? कसे वागावे ? हे प्रश्न माणसाच्या आयुष्यात नेहमीच येत असतात.जी कृती केलीच पाहिजे, असे ठामपणे वाटते,त्या कृतीत कर्तव्यता असते.त्यानंतर ती कृती प्रत्यक्षात करणे म्हणजे कर्तव्य (Duty) होय.प्रत्यक्ष कृती करण्याची भावना ही कर्तव्यता असते तर ती थेट करणे हे कर्तव्य असते.म्हणून केवळ कर्तव्य करावे, असा विचार करणे हे कर्तव्य नव्हे. कर्तव्य हे विशेषण वर्तनप्रकारालाच लागू करता येते.कर्तव्य हे नैतिक ध्येय असते.त्याची प्रेरणा ती कर्तव्यता होय.उदाहरणार्थ लाच घेवू नये, दिलेले वचन पाळावे, खोटे बोलू नये,प्रत्येकाचा स्वातंत्र्यचा हक्क जपला गेलाच पाहिजे.

इंग्रजीतील duty आणि obligation या शब्दांचे भाषांतर साधारणपणे 'कर्तव्य' असे एकाच शब्दात केले जाते.पण तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून आपण त्यात सूक्ष्मपणे भेद करु शकतो.केला पाहिजे.duty म्हणजे कर्तव्य आणि obligation म्हणजे कर्तव्यता. ही सामान्य नैतिक बंधन अशा स्वरुपाची असते. obligation अनेक असतात.त्यापैकी एक कुठलीतरी प्राप्त परिस्थितीत duty कर्तव्य ठरते.भारतीय परिभाषेत सांगावयाचे तर obligation म्हणजे ऋण आणि duty म्हणजे स्वधर्म असा करता येईल.ऋणे अनेक असतात, पण ती सगळी फेडली जातातच असे नाही .स्वधर्म करणे मात्र बंधनकारकच असते.

एखादी कृती करणे हे कर्तव्य असताना त्याक्षणी मनाला काय वाटते ? काय भावना आहेत ? माझ्या प्रवृत्तीशी ते करणे जुळते का? हे महत्वाचे नसते.मनाचा कल काहीही असला ते कर्तव्य करणे अतिशय आवश्यक आहे,म्हणून करावयाचे असते.अशी बंधकता असणे याचा अर्थ कर्तव्यता असणे होय.

या बंधकतेचा अर्थ काय ? तर बंधकत्वात एक विशिष्ट प्रकारची आवश्यकता असते.जीवनातील आवश्यकता तीन प्रकारची असते.ती अशी:

Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052

---



1. **नैसर्गिक आवश्यकता:** निसर्ग नियमानुसार घडणारी कृती नैसर्गिकरित्या आवश्यक असते. उदाहरणार्थ अधांतरी दगड खाली पडतो.निसर्ग नियम बदलता येत नाहीत आणि तोडताही येत नाहीत.
2. **नैमित्तिक आवश्यकता:** शासकीय कायदे,रुढी,परंपरा,संकते इत्यादीचे नियम पाळावे लागतात.पण सक्ति नसते.ते बदलता येतात व तोडताही येतात.उदाहरणार्थ वाहतुकीचे नियम, लग्नाची रित.
3. **नैतिक आवश्यकता:** खोटे बोलू नये ' अशासारखा नियम नैतिकदृष्ट्या आवश्यक असतो.तो तोडता येतो पण बदलात येत नाही; 'खोटे बोलावे ' असा बदल करता येत नाही.तो तोडता आला तरी त्याचे पालन झालेच पाहिजे, ही आवश्यकता असते.हीच नैतिक आवश्यकता होय.

या आवश्यकतेलाच कर्तव्याचे बंधकत्व म्हणतात. कर्तव्यता तिच्यातूनच येते.काण्टचा निरुपाधिक आदेश अथवा भगवतगीततेतील श्रीकृष्णाचा अर्जुनाचा उपदेश ही कर्तव्यतेची आणि कर्तव्याची ठळक उदाहरणे होत.

## कर्तव्यबुध्दिचा विकृत अर्थ

कर्तव्यता करण्याची बुध्दि म्हणजे कर्तव्यबुध्दि (Sense of duty) होय.हा खरा अर्थ होय.पण बऱ्याचदा प्रत्यक्ष वर्तन करताना लोक तिचा अर्थ विकृत करतात.कर्तव्य नाईलाजाने करणे,रुक्षपणे करणे किंवा 'झक् मारीत ' करणे म्हणजे ही ती विकृती आहे.अमुक एक कृती विवेकबुध्दिला पटली की ती आपण आनंदाने आणि उत्साहाने करु शकतो.या भावनेने ती कृती करणे म्हणजे कर्तव्यभावना होय.या कर्तव्यभावनेची आवश्यकता तीच कर्तव्यता होय.

## 4) स्वातंत्र्य :

स्वातंत्र्य म्हणजे स्व - तंत्र अवलंबिणे. स्वत:च्या पध्दतीनुसार वागणे. स्वतंत्रतेने वागण्याची संधी असणे म्हणजे स्वातंत्र्य होय.हा सामाजिक आणि राजकीय अर्थ आहे.स्वातंत्र्यास धार्मिक आणि सत्ताशास्त्रीय अर्थ सुध्दा आहे. तो म्हणजे पापातून मुक्ति, जन्ममरणातून सुटका किंवा मोक्ष.पण येथे हा अर्थ अपेक्षित नाही. तर फक्त सामाजिक आणि राजकीय तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून अर्थ अपेक्षित आहे.इंग्रजीतील Freedom , Liberty या शब्दांपैकी जास्त जवळचे Liberty चेच भाषांतर म्हणजे स्वातंत्र्य होय. जे.एस. मिल्लचे हे पुस्तक त्याच अर्थाचे आहे.

Liberalism म्हणजे उदारमतवाद.म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्यवाद.मत मांडण्यास मोकळे असणे.आधुनिक जगतातील ती एक महत्वाची विचारसरणी आहे.युरोपात ती सोळाव्या शतकात तिचा उदय झाला.

## स्वातंत्र्याचे प्रकार

### (अ ) .. .. च्यापासून आणि .. .. च्यासाठी स्वातंत्र्य

स्वातंत्र्य म्हणजे काय ? स्वातंत्र्य ही संकल्पना निश्चित करणे,तितके सोपे नाही.फार पूर्वी जेव्हा गुलामगिरी अस्तित्वात होती, त्या संदर्भात स्वातंत्र्याचा अर्थ समजू शकत होता.एखादी व्यक्ती स्वतंत्र आहे, असे म्हणतांना तिला काही कायदेशीर हक्क आहेत.आणि ती आपले कर्तव्य करु शकते, असे म्हटले जाई. असे करण्यासाठी ती विशिष्ट प्रकारच्या गुलागिरीतून मुक्त झालेली आहे, असे गृहीत धरले जात असे.म्हणजेच बंधने किंवा गुलामी यांच्या **'विरोधात'** स्वातंत्र्य ही संज्ञा प्रचलित होती.पण आज मात्र केवळ एखादया व्यक्तीला कायदेशीर हक्क आहेत,म्हणून ती स्वतंत्र आहे असे म्हटले जात नाही ; तर ती स्वतंत्र आहे असे म्हणताना तिच्या विशिष्ट सद्‌गुणांचा सुध्दा उल्लेखही करावा लागतो.पण हे ही तितकेसे खरे नाही. कारण बऱ्याच वेळेस सदगुणी असूनही व्यक्ती स्वतंत्र असतेच,असे नाही.सद्‌गुणी ती कुणाच्या तरी बंधनात असू शकते. तिला हक्कही असतात. पण ती स्वातंत्र्य असतेच असे नाही. कैदी, किंवा पती - पत्नी इ. मग एखादी व्यक्ती स्वतंत्र असते, म्हणजे नेमके काय ?

याचे उत्तर असे की 'स्वातंत्र्य' ही संज्ञा उपयोगात आणतांना तीन प्रकारचे प्रश्न उपस्थित करावे लागतात. ते असे :

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

(1) ती व्यक्ती 'कुणापासून' स्वतंत्र आहे ?

(2) ती व्यक्ती 'कशासाठी' स्वतंत्र आहे ?

(3) जिच्या स्वातंत्र्याची चर्चा चालू आहे, ती व्यक्ती नेमकी 'कोण' आहे ?

समजा एखादी अनोळखी व्यक्ती भेटली आणि म्हणाली, ''आता मी स्वतंत्र आहे'' तर प्रश्न येतो की कशापासून कुणासाठी आणि तुम्ही कोण ? म्हणजे ती व्यक्ती तुरुंगातून सुटली आहे की बायकोपासून - नवऱ्यापासून मुक्त झाली आहे; हे कळाल्याशिवाय त्या व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा अर्थच कळू शकत नाही.एवढेच नव्हे तर याचा अर्थ ' ती व्यक्ती *'कशापासून'* स्वतंत्र असते हे स्पष्ट करावे लागते. ते काय ? ते म्हणजे बंधन ! कसले ? तर कोणतेही ! बंधनांचा अभाव म्हणजे स्वातंत्र्य.समजा एखादी ' क्ष ' ही गोष्ट करण्यासाठी व्यक्तीसमोर अनेक बंधने असतील त्यातील एखादेच नाहीसे होवून चालणार नाही तर ती सारीच बंधने नाहीशी व्हावी लागतील.तरच ती व्यक्ती खऱ्या अर्थाने स्वतंत्र झाली ,असे म्हणता येईल.

आपण नाहीशा झालेल्या बंधनाबाबत बोलतो,तेंव्हा आपणास काहीतरी करावयाचे स्वांतत्र्य आहे,असे सूचित करावयाचे असते.पण बंधनामुळे आपण करू शकत नाही, हे सुध्दा त्याचवेळी व्यक्त केले जात असते आणि त्याच बंधनापासून स्वातंत्र्य मिळविणे म्हणजेच '' कशापासून तरी स्वातंत्र्य मिळविणे '' असते.आपणास हवे असलेले असे काहीतरी करण्यासाठी ते स्वातंत्र्य हवे असते.म्हणून स्वातंत्र्य हे '' कशासाठी तरी '' असते.याचा अर्थ स्वातंत्र्य **''.. .. च्यापासून आणि .. . . च्यासाठी''** असते. या दोन्ही बाबी एकाच नाण्याच्या बाजू असतात.म्हणजेच ते स्वातंत्र्याचे प्रकार ठरत नाहीत तर स्वातंत्र्याच्या परस्परपूरक बाजू बनतात.एखादी व्यक्ती कोर्टाबाहेर उभी राहून '' मी आता स्वतंत्र आहे '' असे सांगते तेंव्हा ती अर्धवटच बोलत असते.ती फक्त ' कशापासून ' तेवढेच सांगते.' कशासाठी ' ते सांगत नाही.आणि जोपर्यंत ती ते सांगणार नाही तोपर्यंत तिच्या स्वांतत्र्याला काहीच अर्थ नसतो. तो शन्य असतो !!

बरे , एखादी व्यक्ती *'एखादीच'* गोष्ट करण्यासाठी मुक्त असेल पण *'इतर '*करण्यासाठी मुक्त नसेल तर त्या मुक्तीलाही पूर्णता येत नसते. ती व्यक्ति संपूर्ण स्वतंत्र आहे, हे सांगण्यासाठी, तिला असलेल्या स्वातंत्र्याचा उपयोग काय ? कशासाठी ? हे तिला कळत नाही तोपर्यंत ते स्वातंत्र्य अपूर्णच रहाते. ती त्याचा उपभोग तरी कसा काय घेणार ? राजकीय पक्ष अशा स्वातंत्र्याची घोषणा करतात तेंव्हा तर ते अतिअवघड बनते.कारण 'कशापासून आणि कशासाठी स्वातंत्र्य ' याची उत्तरे ते जनतेला **'कधीही देत नाहीत ! '**

स्वातंत्र्याच्या या तीन बाजूचे सूत्र पुढीलप्रमाणे :

**'' कुणीतरी कशापासूनतरी काहीतरी करण्यासाठी मुक्त असणे = स्वतंत्र असणे ''**

**" X is Free From Y to do Z = Freedom "**

## ( ब ) ऐच्छिक स्वातंत्र्य विरूध्द अनैच्छिक स्वातंत्र्य

यातील ऐच्छिक स्वातंत्र्यास आपण जास्त महत्व देतो.इच्छेनुसार मिळणे = ऐच्छिक. एखादी इच्छा आता या क्षणाला पूर्ण होत नसली तरी नंतर कधीतरी ती पूर्ण होवू शकते. म्हणजे एकतर इच्छा पूर्ती शकणारी परिस्थिती निर्माण होते किंवा मग आपल्यातच काही बदल हावू शकतात.याचा अर्थ असा की बदल करण्याचेही स्वातंत्र आपणास असते आणि नजीकच्या भविष्यकाळात इच्छा पूर्ती होण्याचे मार्ग खरोखरच उपलब्धही होवू शकतात.आपल्याला आपली इच्छा पूर्ण करता येवू शकते.

या कारणामुळेच अनैच्छिक स्वातंत्र्य आणि ऐच्छिक स्वातंत्र्य यात फरक करावा लागतो.तो असा की ' इच्छा नसतांना लादलेले स्वातंत्र्य म्हणजे अनैच्छिक स्वातंत्र्य तर इच्छा असताना मिळालेले / मिळविलेले स्वातंत्र्य होय.लादलेल्या स्वातंत्र्यात निराशा कमी करता येवू शकते.कारण त्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करता येते. तर ऐच्छीक स्वातंत्र्यात ऐच्छीक इच्छा पूर्ण होण्याच्या अनेक संभाव्य पर्यायाची संख्या वाढण्याची **वाट पाहता येते**.अनैच्छिक स्वातंत्र्याद्वारे एखादी व्यक्ती तिला ज्यावेळेस काही करावयाचे असते त्यावेळेस इच्छ पूर्ण करण्याचे स्वातंत्र्य असते.तिला त्याही पेक्षा जास्त करता येते. तशी संधी तिला उपलब्ध असते. अनैच्छिक



Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

स्वातंत्र्यात मात्र अशी संधी नसते.हा फरक लक्षात घेता त्यापैकी एकाची निवड करण्याचा प्रसंग आला तर आपण ऐच्छिक स्वातंत्र्याची निवड करु .कारण त्यात आपल्या इच्छा पूर्ण होण्याच्या संधी सर्वात जास्त असतात.

वेगळ्या भाषेत सांगावयाचे तर आपले ऐच्छिक स्वातंत्र्य हेच खरे मूल्यवान असते..मात्र स्वातंत्र्य मूल्यवान आहे, याचा अर्थ त्याची सांगड त्यात संबंधित होणाऱ्या इतर मूल्यांशी घालता कामा नये. उदा. आनंद.कारण काही वेळेस आनंद हा जबरदस्तीने सुध्दा मिळविता / उपभोगता येतो.याचा अर्थ एवढाच की स्वातंत्र्य आणि आनंद या वेगवेगळ्या बाबी आहेत !

### (क) सकारात्मक स्वातंत्र्य आणि नकारात्मक स्वातंत्र्य :



स्वातंत्र्याच्या या दोन भूमिका आहेत.बंधकतेचा अभाव असणे म्हणजे सकारात्मक स्वातंत्र्य आणि बंधकता असणे म्हणजे नकारात्मक स्वातंत्र्य. सकारात्मक स्वातंत्र्य व्यक्त करण्यासाठी नेहमीच ' .. .. च्या पासून मुक्त असणे आवश्यक असते. तर तसे हे नकारात्मकतेचे लक्षण असते.

### बंधनाचे तत्त्व :

स्वातंत्र्याला बाधा आणणारे मुख्य तत्त्व म्हणजे बंधन. बंधन म्हणजे रोखले जाणे. बंधने मुख्यत: आंतरिक आणि बाह्य अशा स्वरुपाची असतात.पण ही बंधने येतात कुठून ? प्रथम ती 'जुलुम' या रुपात शासनाकडून, राज्यसंस्थेकडून किंवा कोणत्याही प्रकारच्या स्थानिक शासकाकडून येतात.जिथे आपण काम करतो त्या शासकाकडून लादले जातात.तिथे नियमांपेक्षा त्यांचे स्वरूपच वेगळे असते.त्यांच्या कडून बऱ्याचदा नियमाच्या स्वरूपातही बंधने समोर येतात.या बंधनांना **'बाह्य बंधने'** म्हणतात.पण काही वेळेस आपणा स्वत:कडूनही ती येतात. स्वत:कडून येणाऱ्या बंधनांना **'अंतर्गत बंधने'** म्हणता येईल. या दोन्ही प्रकारच्या बंधनांचे **सकारात्मक व नकारात्मक** वर्गीकरण करता येईल. ते असे :

1. बाह्य सकारात्मक बंधने : चळवळ चालू असता तुरुंगात डांबले जाणे.
2. बाह्य नकारात्मक बंधने : पैशाची कमतरता, वाहतुकीची साधने नसणे, इ.इ
3. आंतरिक सकारात्मक बंधने : डोकेदुखी,अतिविचार
4. आंतरिक नकारात्मक बंधने : गरीबी,दारिद्रय,अशक्तपणा,अज्ञान

बंधने ही मानवनिर्मित दुरिते असतात.शासन आणि निसर्गाकडून बाहय बंधने येतात.अंतर्गत बंधने मानवनिर्मित व समाजनिर्मित असतात. लोकांना नियंत्रणात ठेवण्यासाठी बंधने शासनाकडून लादली जातात. म्हणजे लोकांच्या ऐच्छिक स्वातत्र्याचे नियंत्रण करुन भासात्मक स्वातंत्र्य दिले जाते.नकारात्मक बंधकतेपासून स्वांतत्र्य म्हणजे सकारात्मकतेचा अभाव.अशा वेळेस बाह्य परिस्थिती अनुकूल असणे म्हणजे 'संधी'.आणि आंतरिक अनुकूलता असणे म्हणजे **'क्षमता'** होय.

थोडक्यात,

(a) बंधकता म्हणजे जे जे एखाद्याला एखादी 'क्ष' गोष्ट करण्यापासून रोखते ते सर्व काही.
(b) सकारात्मक स्वातंत्र्य म्हणजे नकारात्मक बंधनांचा अभाव
(c) नकारात्मक स्वातंत्र्य म्हणजे सकारात्मक बंधनांचा अभाव.

## 5) न्याय

प्लेटोने चार सद्‌गुणांपैकी न्याय हा एक सदगुण सांगितला. पण त्याचे दोन अर्थ होतात. पहिला आत्म्याचा आणि दुसरा सामाजिक आणि नैतिक न्याय.सद्‌गुणांमध्ये संतुलन असणे हा आत्मिक अर्थ झाला.शिवाय प्लेटो ॲरिस्टॉटलने सांगितलेले अर्थ व्यक्तिगत आहेत.पण सामाजिक व नैतिक न्यायाचे स्वरुप ठरविणे मात्र कठिण जाते. 'न्याय म्हणजे काय ?' हा प्रश्न यथार्थतेने उपस्थित करणारा प्लेटो हाच पहिला ग्रीक विचारवंत होय.त्याचे सारे नीतिशास्त्र 'न्याय' या एकमेव संकल्पनेभोवतीच गुंफलेले आहे.त्याला न्याय व्यक्तिंच्याा सुसंवादात,समाजात आणि राज्यव्यवस्थेत दिसतो.'रिपब्लीक' या संवादात प्लेटोने न्याय संकल्पनेची

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

समीक्षा केलेली आहे. माणूस जगताना काहीएक व्यवस्थेत जगत असतो आणि ती लक्षात घेवूनच त्याला खरे सुख मिळण्यातच न्याय असतो, हा रिपब्लीकचा संदेश आहे.

न्यायाची समस्या खरी तर कुणी फायदा घ्यावा आणि कुणी तोटा सहन करावा, चांगल्या- वाईटाचे वाटप कसे करावे या समस्येचेच रुप आहे.कायद्याच्या भाषेत न्यायाचे स्वरुप ठरविता येते पण न्यायाची नैतिकता कशी ठरवावी, हाच एक नैतिक प्रश्न आहे.

संस्कृतमधील न्याय शब्दाचा अर्थ 'उभय पक्षांना मान्य असणारा निर्णय. 'नीयते अनेन इति न्याय: ' अशी न्यायाची व्याख्या आहे. त्याचा अर्थ ''जो आपल्याला निष्कर्षाकडे नेतो तो न्याय'' इंग्लीशमधील Justice चा ही अर्थ तसाच आहे. Justice मधील Just म्हणजे ते आणि तेच देणे (किंवा घेणे) याचाच अर्थ ''जे एखाद्याला देणे आवश्यक आहे ते त्याला मिळणे म्हणजे न्याय '' होय.अर्थात प्लेटोने याच व्याख्येवर टीका करुन न्याय ही माणसाची प्रवृत्ती असते, असे म्हंटले आहे.न्याय ही आंतरिक गोष्ट असते.तिला तो कर्तव्य म्हणतो.प्रत्येकाने आपले कर्तव्य केले तरच आदर्श राज्य निर्माण होते,अशी त्याची धारणा आहे .



## नैतिक न्याय

सर्वांच्या योग्य अपेक्षा आणि हक्क पूर्ण करणे; त्याचप्रमाणे माणूस हा मूल्यवान आहे, हे अंतिम मूल्य मान्य करणे हा न्याय असतो.कारण मानवी समाज ही अनेक पदरी नात्यांची गुंफण असते.प्रत्येक नात्याला समान न्याय मिळणे गरजेचे असते.प्रत्येकाला काही हक्क आणि कर्तव्ये असतात. प्रत्येकाने दोन्हीची काटेकोर पालन करणे हा न्याय्य समाज असतो. हक्क आणि कर्तव्य यांचे परस्परावलंबी पालन ही नैतिक न्यायाची सुरुवात असते.

नैतिक न्याय हा मुख्यत: माणूस हा समाजाचा सदस्य आहे आणि तो नैतिक जबाबदार कर्ता आहे, या जाणीवेवर आधारलेला असतो.शुभजीवनासाठी प्रत्येकाचा हक्क बजावू देणे,तशी संधी त्याला उपलब्ध करुन देणे या कडे नैतिक न्याय लक्ष देतो.हक्कमध्ये पक्षपात होणार नाही, स्वातंत्र्य आणि समता न्यायाशी निगडीत राहणे हाच समाजजीवन सुरक्षित राहण्याचा आधार असतो. व्यक्तिला विकासासाठी आवश्यक संधी उपलब्ध करणे, हा नैतिक न्याय असतो.

नैतिक न्याय व कायदेशीर न्याय एकमेकांच्या बरोबर असले पाहिजेत. पण कायदेशीर न्यायापेक्षा नैतिक न्याय हाच समाज सुरक्षित व संतुलित ठेवतो,म्हणून या दोघात निवड करण्याची वेळ आली तर नैतिक न्यायाचीच केली पाहिजे.दुसरे म्हणजे कायदाच कधी कधी अन्यायकारक असतो.शिवाय कायदा करणारे बहुधा समाजातील सत्ताधिकारी,बलवान लोकच असतात.ते त्यांच्याविरोधातील कायदे करीत नसतात.त्यामुळेच नैतिक न्याय कायद्यात व्यक्त होईल, असेही नसते.तो कायद्यापेक्षा नैतिक नियमांना धरुनच दिला जातो.व्यक्तिला किंवा समाजाला तो इतका सहज उपलब्ध असावा की तो नैसर्गिकच वाटला पाहिजे,म्हणूनच नैतिक न्यायालाच ' नैसर्गिक न्याय ' म्हंटले आहे.

## सामाजिक न्याय

सामाजिक न्याय ही मात्र जटील बाब ठरते. खरे तर सामाजिक न्याय हे नैतिक न्यायाचे सामाजिक प्रात्यक्षिकच असते.ते अमलात आणताना ज्या अडचणी येतात त्याच सामाजिक न्यायाच्या समस्या बनतात.समाजात ज्यावेळी विविध प्रकारच्या विषमता वाढीस लागतात त्यावेळी तर सामाजिक न्यायाचे प्रश्न जास्तच उग्र बनतात.दारिद्र्य,बेरोजगारी,महागाई एकीकडे आणि अतिश्रीमंती, नवश्रीमंती दुसरीकडे हे चित्र योग्य नसतेच.सर्व सामाजिक उत्पादनावर सर्वांचा समान हक्क व समान वितरण असेल तरच व्यक्तिला आत्मस्वातंत्र्याची संधी मिळू शकते, हे न्यायाचे गृहीततत्त्व बनते.

## न्यायाचे तीन प्रकार

वितरणात्मक न्याय,प्रतिशोध न्याय आणि परिमार्जक न्याय.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052

---

### 1. वितरणात्मक न्याय :

समाजातील संपत्ती,प्रतिष्ठा , मानससन्मान आणि इतर सुखवस्तूंचे सर्वाना रास्त वितरण करणे हा वितरणात्मक न्याय होय.सर्व माणसे समान आहेत, हा निकष या न्यायामागे असतो. परंतु समानता म्हणजे काय ? हाच मोठा अवघड प्रश्न येथे उपस्थित होतो.समानता म्हणजे सुखवस्तूंचे सर्वाना रास्त वितरण करणे म्हणता येत नाही. कारण सर्वांच्या गरजा किंवा प्रत्येकाच्या गरजा वेगवेगळ्या असतात.प्रत्येकाची पात्रताही समान नसते.'समान संधि' किंवा सर्वांचा 'समान विचार' असेही म्हणता येत नाही. कारण येथेही पात्रता,संधि कशाच्या आधारे ठरवावी, हा प्रश्न निर्माण होतो.



### 2. प्रतिशोध न्याय :

एखाद्याने केलेल्या दुष्कृत्याबद्दल , गुन्ह्याबद्दल त्याला योग्य ती शिक्षा करणे म्हणजे त्याचा प्रतिशोध घेणे असते.ती शिक्षा त्या व्यक्तिला दिलीच पाहिजे, हे न्याय्य आहे,अशी धारणा प्रतिशोध न्यायामागे असते.शिक्षा हा त्या दुष्कृत्याचा मोबदला असतो.कृतीचा मोबदला देणे आवश्यकच असते,हा ही न्यायाचा भाग आहे.येथे समानता हे तत्त्व नसून ' निष्पक्षपातीपणा' हा निकष असतो.

### 3. परिमार्जक न्याय:

परिमार्जन करणे म्हणजे नुकसान भरपाई देणे.अन्यायग्रस्ताचे काहीएक विशिष्ट स्वरुपाचे नुकसान झालेले असते.त्या बद्दल त्यास भरपाई दिली पाहिजे.ही भरपाई कदाचित नुकसानीच्या प्रमाणात नसली तरी काही प्रमाणात ती देणे नैतिकदृष्ट्या बंधनकारक असते.ती देण्याने काही प्रमाणात का होईना पण न्यायाचे तत्त्व प्रस्थापित करता येते.दुसरे म्हणजे अन्याय झाल्याने त्या संबंधित अन्यायग्रस्त व्यक्तिचे नुकसान झालेले असते तसे समाजाचेही नुकसान झालेले असते.कोणतेही नुकसान खरे तर भरुन काढता येत नाही.पण अन्यायग्रस्त व्यक्ति सुध्दा समाजाच भाग असल्याने तिला नुकसान भरपाई दिल्यामुळे एकार्थाने समाजालाच भरपाई दिल्यासारखे होते.

## 2) शिक्षेचे सिध्दान्त

आपण असे म्हंटले की शिक्षा हा त्या दुष्कृत्याचा मोबदला असतो.कृतीचा मोबदला देणे हा न्यायाचाच भाग आहे.ती शिक्षा कशी द्यावी, का द्यावी यासंबंधीही विचार करणे आवश्यक असते.शिक्षेचे समर्थन करता आले तरच ती देण्याला अर्थ राहातो.म्हणून शिक्षेचे सिध्दान्त पाहू.ते मुख्य तीन सिध्दान्त असून त्यांच्यातून एक समावेश सिध्दान्त निष्पन्न झाला आहे.सिध्दान्तालाच उपपत्ती असाही शब्द आहे.या सर्वांचे स्वरुप पुढील प्रमाणे

1) शिक्षेची निवारणवादी उपपत्ती
2) शिक्षेची प्रतिशोध उपपत्ती
3) दंडाची सुधारणावादी उपपत्ती
4) समावेशक उपपत्ती
5) क्षमाशीलता

### अ ) शिक्षेची निवारणवादी उपपत्ती (The Deterrent Theory of Punishment )

To deter म्हणजे लांब ठेवणे. Deterrent म्हणजे लांब ठेवणारी.गुन्हा शाबीत झाल्यावर तो गुन्हा परत घडू नये,यासाठी अपराध्यास शिक्षा करावयाची असे ही उपपत्ती सांगते.यामागे इतर काही हेतू असे:

1) गुन्हेगाराला अद्दल घडावी आणि ज्या प्रकारचा गुन्हा त्याने केला होता तसल्या प्रकारचा गुन्हा पुन्हा करण्यापासून त्याने परावृत्त व्हावे.

2) त्याला झालेली शिक्षा पाहून इतरांनाही जरब बसावी आणि त्यामुळे समाजात तसल्या प्रकारचे गुन्हे परत होऊ नयेत.

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

3) अपराध्याला बंदीत टाकल्यावर निदान शिक्षेची मुदत संपेपर्यंत तो इतरांस उपद्रव देणार नाही.म्हणून तिला **प्रतिबंधक शिक्षा** असे म्हणता येईल.

या सर्वांचा अर्थ असा की, अपराध्याला शिक्षा करावयाची ती त्याच्या शिक्षेमुळे समाजाला काही फायदा व्हावा म्हणून. मेंढया चोरलेल्या एका गुन्हेगारास न्यायाधीश म्हणाला '' तू मेंढया चोरल्यास म्हणून ही शिक्षा नव्हे तर मेंढया चोरल्या जाऊ नयेत यासाठी मी तुला शिक्षा करत आहे.''भावी अपराधाचे निवारण व्हावे म्हणून उपराध्यास शिक्षा करावयाची असा त्या उपपत्तीचा अर्थ घ्यावयाचा आहे.

**आक्षेप :**

या उपपत्तींवर दोन आक्षेत येतात


**अ )** दुसऱ्या व्यक्तीचे काही भले व्हावे म्हणून जर एखादयाला काही शिक्षा व्हावयाची असेल तर तो साहजिकच म्हणेल की '' इतरांचे चांगले व्हावे यासाठी मला शिक्षा करणे हे चूक आहे.ते न्यायाला धरुन होणार नाही. इतरांचे बरे करण्याची जबाबदारी माझ्यावर नाही.लाभ इतरांना आणि शिक्षा मला ? हे मी का म्हणून स्वीकारवे ? इतरांना जरब बसावी म्हणून एखादया व्यक्तीला शिक्षा करावी हे तत्व जर मान्य केले तर चमत्कारीक प्रसंग निर्माण होतात. समजा, एखादा खून घडला आहे. प्रयत्न करुनही खरा गुन्हेगार सापडत नाही. अशा वेळी समाजात दहशत निर्माण व्हावी म्हणून एखादया निरपराध व्यक्तीस तिच्या विरुध्द खोटाच पुरावा निर्माण करुन फाशी देणे योग्य कसे होईल ? लोकांना जरब बसावी हे शिक्षेचे कार्य त्याला फाशी देण्याने होईल ही तरीसुध्दा खोटा पुरावा रचून निरपराध व्यक्तीस सजा देणे हे अन्यायाचेच मानले जाईल.

**आ )** या उपपत्तीवर दुसरा आक्षेप असा की, लोकांना भीतीच्या दडपणाखाली सदाचारी बनविल्यासारखे होईल. पण सक्तिने कुणाला चांगले वागा, असे सांगणे हेच अनैतिक होईल.मग नैतिक व अनैतिक फरक काय राहिला ?

## ब) शिक्षेची प्रतिशोध उपपत्ती : (The Retributive Theory of Punishment )

ज्या उपपत्ती मध्ये शिक्षेचा कोणताही फायदा विचारात घेतला जात नाही,अशी दुसऱ्या टोकाची म्हणजे प्रतिशोध उपपत्ती होय.कांट आणि ब्रॅडले यांनी तिचा पुरस्कार केला.

**Francis Herbert Bradley**
(30 January 1846 – 18 September 1924)
a British idealist philosopher.
During his life, he was granted
honorary degrees many times.
The first British philosopher to be
awarded the Order of Merit.



या उपपत्तीप्रमाणे अपराध्याला शिक्षा दयावयाची ती त्याने गतकाळात गुन्हा केलेला आहे एवढयाचसाठी. त्याला शिक्षा देऊन समाजाचे काय काय फायदे होतील याचा विचार करण्याची गरज नाही. कांटच्या मते जर उदया समाजातील सर्व व्यक्तींनी मिळून एकमेकांचे ऋणानुबंध आणि लागेबंध तोडून टाकावयाचे ठरवले तरीसुध्दा तसे करण्यापूर्वी फाशीची शिक्षा होऊन कोठडीत मृत्यूची वाट पाहात असलेल्या शेवटच्या गुन्हेगारास आज फाशी दिले पाहिजे. उदयापासून समाज ही गोष्ट अस्तित्वात नसल्याने गुन्हे होऊच शकणार नाहीत. पण त्या माणसाचा गुन्हा पूर्वी घडला आहे आणि त्या झाल्या गुन्हयाबद्दल त्याला योग्य ती शिक्ष करणे आवश्यक आहे.

प्रतिशोध घेणे म्हणजे सूड घेणे असते. आपल्यावर अत्याचार झाल्यास अत्याचार करणाऱ्याचा सूड घ्यावा, प्रतिशोध घ्यावा अशी एक साहजिक प्रवृत्ती माणसात असते.पण या उपपत्तीनुसार ही सूड भावना

वगळूनच अपराध्याला शिक्षा देणे कर्तव्य मानले पाहिजे.सूडातून शिक्षा देणे ही कृती नैतिक होणार नाही,असे कर्तव्यवादी नितीमीमांसक मानतीलच मानतील. सुडबुध्दीतील भावनेचा म्हणजे विकारांचा अंश काढून टाकण्यासाठी समाजाने न्याययंत्रणा निर्माण केली आहे. समाजाचा नैतिक विवेक न्यायाधीशाच्या मुखाने शिक्षा सुनावतो.न्यायाधीशाच्या मनात सुडाची भावना नसते.न्यायाधीश म्हणजे समाजाची विवेकबुध्दि असते.म्हणून प्रतिशोध उपपत्ती स्वीकारल्यावर आपण असंस्कृत माणसाच्या सुडबुध्दीपाशी येऊन पोहोचतो असे बिलकुल नाही. या उपपत्तीचे म्हणणे इतकेच आहे की, गुन्हा केला हेच शिक्षा करण्यास पुरेसे समर्थन आहे. शिक्षेचे फायदे काय होतील याचा विचार करणे म्हणजे अपराधी माणसाकडे ''तो इतरांच्या हिताचे साधन आहे'' अशा दृष्टीने पाहिल्यासारखे होईल. ही दृष्टी नितीशास्त्राला मंजूर असणार नाही. कारण, मनुष्य व्यक्ती हे साध्य आहे,साधन नाही.



आक्षेप :

शिक्षेच्या प्रतिशोध उपपत्तीवर दोन आक्षेप येतात.

**अ)** जगात गुन्हा घडला म्हणजे एक पाप झाले. पाप ही एक वाईट गोष्ट आहे. आता त्या गुन्हेगाराला शिक्षा देणे म्हणजे त्याला शारीरीक आणि मानसिक पीडा देणे होय.मग जगात आणखी एका वाईट गोष्टीची भर घातल्याने जगात वाईटाचे प्रमाण अधिकच होणार त्याचे समर्थन कसे करता येईल ?

**आ)** प्रत्यक्षात असे दिसते की, न्यायाधीश जेव्हा शिक्षा देतात तेव्हा शिक्षेच्या परिणामाचाही ते विचार करतात आणि तो जमेस धरुन शिक्षेच्या प्रमाणात फरक करतात. एकच गुन्हा एखादया सामान्य माणसाने केला आणि एखादया उच्च पदस्थ माणसाने केला तर त्या दोघांना एकसारखीच शिक्षा होणार नाही. त्या शिक्षेचे सामाजिक फायदे तोटे काय होतील याचा न्यायाधीश विचार करतील.

## क) दंडाची सुधारणावादी उपपत्ती (The Reformative Theory of Punishment )

शिक्षेसंबंधी आणखीही एक उपपत्ती आहे.शिक्षेचे कार्य अपराध्याची सुधारणा करावी हे असते, असे ही उपपत्ती मानते.ही उपपत्ती स्वीकारुनच मराठीतील शिक्षा हा शब्द आलेला आहे. 'शिक्ष्' या क्रियापदाचा अर्थ शिकवणे असा आहे.त्यामुळेच तर हिन्दीतही शिक्षा म्हणजे शिकवणे.

या मताप्रमाणे गुन्हेगारी वृत्ती ही एका प्रकारच्या मानसिक कमतरतेची निदर्शक आहे. तो एक मनाचा रोग आहे. शारीरीक रोगाने पछाडलेल्या माणसास बरे करण्याचा आपण प्रयत्न करतो. त्याची काळजी घेतो. शुश्रुषा करतो. गुन्हेगाराच्या म्हणजेच मानसिक रोग्यांच्या बाबतीत सुध्दा आपण हीच गोष्ट केली पाहिजे.

मनुष्य स्वभावत: चांगला असतो. तो दुराचारी बनतो तो परिस्थितीमुळे किंवा अज्ञानामुळे किंवा काही मानसिक दोषांमुळे.गुन्हेगाराला सुधारले पाहिजे.त्याला शिक्षण दिले पाहिजे.तुरुंगाचे रुपांतर संस्कारशाळेत केले पाहिजे.अपराध्यास केवळ त्याने गुन्हा केला म्हणून शिक्षा देणे अथवा इतरांना जरब बसावी म्हणून त्यास शिक्षा देणे हे रानटीपणाचे आहे. सुसंस्कृत समाजात तसे करणे योग्य नाही.

आक्षेप :

1) या उपपत्तीमुळे 'व्यक्तीची नैतिक जबाबदारी' ही गोष्ट मुळातच नाहीशी होते.प्रत्येक माणूस केवळ अज्ञानी अथवा दुर्बळ ठरु लागला तर जगात पाप,गुन्हा अथवा दुरीत नावाची गोष्ट उरत नाही.मग प्रत्येकजण निर्दोषच ठरेल ! गुन्हा घडल्यावर अपराध्याबद्दल अनुकंपा दाखववयाची,त्याचा निषेध करावयाचा नाही,असे या उपपत्तीतून निघते.

लहान मुलांच्या बाबतीत, वेडयांच्या बाबतीत अथवा विशेष रीतीने रोगग्रस्त आहेत त्यांच्याबाबतीत ही गोष्ट मान्य करता येईल. पण सर्वच लोकांना हा न्याय लावला तर नैतिक-अनैतिक, योग्य-अयोग्य, सदाचार-दुराचार हा भेदच नष्ट होऊन जाईल. व्यक्ती स्वतंत्र असते आणि म्हणून ती आपल्या कृत्याबद्दल जबाबदार असते. या आधारावरच हे भेद केले गेले आहेत.ही नैतिक जबाबदारीची कल्पना आपण टाकून दिली तर नीतिमीमांसेचा पायाच उखडला जाईल. म्हणून दंडाची शिक्षेची ही सुधारणावादी उपपत्तीही सर्वांशाने मान्य करता येत नाही.

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052



2) दुसरे असे की, सुधारणावादी उपपत्ती ही का अर्थाने शिक्षेची अथवा दंडाची उपपत्ती नव्हेच कारण, दंड या संकल्पनेत उपराध्याला काही इजा पोहोचावी, त्रास व्हावा ही गोष्ट अंतर्भूत आहे. म्हणून तर तिचे समर्थन करावे लागते. पण त्याला सुधारण्याचा प्रक्रियेत असे काही होणार नसेल तर शिक्षेसंबंधी कोणती समस्याही उभी राहत नाही.व्यक्तीची नैतिक सधारणा करण्याचे जे तंत्र अवलंबले जाईल ते यशस्वी होऊन जर व्यक्ती खरोखरच सुधारली तर त्याविषयी तक्रार करण्याचे कारणच नाही.मग या ठिकाणी दंड नसल्याने शिक्षेची उपपत्ती दयावयाचेही कारण नाही.

### ड) समावेशक उपपत्ती (The Comprehensive Theory of Punishment ):

मुळात व्यक्ती शिक्षेला पात्र होते ते तिने काही अपराध केला होता म्हणून.इतरांचा काही फायदा व्हावा म्हणून ती शिक्षेस पात्र ठरत नाही. प्रतिशोध उपपत्तीतील हा भाग स्वीकारण्यासारखा आहे. त्यामुळे निरपराध माणसास शिक्षा करण्याचा प्रश्नच येणार नाही. पण शिक्षेचे प्रमाण किती असावे हे ठरवताना तिच्या परिणामांकडे नजर देणे वावगे नाही. अपराधी व्यक्तीने गुन्हा करुन इतरांच्या अधिकारावर ज्या मर्यादेपर्यंत आक्रमण केले असेल त्या मर्यादेपर्यंत तिने आपले अधिकार गमावले आहेत. पण या मर्यादेच्या आत राहून आणि परिणामांकडे नजर ठेऊन शिक्षेचे प्रमाण कमी जास्त करता येईल. हे म्हणजे स्वीकारल्यास निवारणवादी उपपत्ती तील सत्यांश आपण घेतला असे होईल. अगदी क्वचित प्रसंगी असे घडेल की उपराध्याला नैतिकदृष्टया जबाबदार धरण्याऐवजी तो अज्ञानी आणि मानसिक रोगी आहे हा दृष्टीकोन योग्य होईल. अशा थोडया बाबतीत सुधारणावादी उपपत्ती सुध्दा मान्य करता येईल. समावेशक उपपत्तीमध्ये तिन्ही प्रसिध्द उपपत्तींचा संग्रह केला गेला आहे.

**जी. इ. मूरचे मत :**

जी. ई. मूर या तत्त्वज्ञाने एक उपपत्ती सुचविली आहे. तो म्हणतो की साध्य मूल्यांच्या चांगुलपणाकडे अथवा वाईपणाकडे सुटेपणाने पाहता येणार नाही.कारण त्यांचा एक आकृतीबंध बनत असतो.मूल्य लक्षात घ्यावयाचे ते संबंध आकृतीबंधाचे.त्या आकृतीबंधाचे जे घटक असतील त्या प्रत्येकाच्या मूल्यांची बेरीज करुन आकृतीबंधाचे मूल्य ठरत नाही असा जी. ई. मूरचा दावा आहे.

त्याच्या म्हणण्याचा अर्थ असा की, जे वाईट आहे त्याच्या जोडीला आणखी वाईट आणून बसविले तर अधिक वाईटाचीच निर्मिती होईल असे नाही.साधारणपणे परिणाम कदाचित कमी वाईटही होऊ शकते.शिक्षा देण्यामागे हा विचार असावयास हरकत नाही. अपराध्याचे पाप ही एक वाईट गोष्ट आहे. पण त्याला शिक्षा झाल्यास एकूण वाईटपणा कमी होतो. शिक्षा न झालेला प्रमत्त, बेमुर्वतखोर गुन्हेगार ही गोष्ट फार भयंकर आहे.शिक्षा देऊन त्या व्यक्तीला काही हालअपेष्टा भोगाव्या लागल्या तर एकूण दृश्य कमी भेसूर होईल.

### ई) क्षमाशीलता (Forgiveness)

अपराध्यास कोणतीही शिक्षा देण्याऐवजी त्याला क्षमा करणे, त्याच्या विषयी क्षमावृत्ती बाळगणे हीही एक प्रतिक्रिया असू शकते. तिचे समर्थन करता येईल काय ? ते पाहण्यासाठी क्षमाशीलतेच्या दोन अर्थांचा विचार करावा लागेल.

अ) क्षमाशीलता अपराध्याबद्दल द्वेष, क्रोध अथवा तिरस्कार न वाटू देणे. तिरस्कार करावयाचा तो अपराधाचा अथवा दुष्टपणाचा, अपराध करणाऱ्याचा अथवा दुष्ट माणसाचा नव्हे. त्याच्याविषयी प्रेमच बाळगावयाचे अशी वृत्ती जर स्वत:मध्ये निर्माण करता येईल तर तो नीतिचा एक आदर्शही होईल.

आ) क्षमाशीलता ही केवळ वृत्तीचा भाग नाही तर कृतीचा भाग आहे. या ठिकाणी क्षमाशीलता म्हणजे उपराध्याला जे योग्य शासन असेल ते न करणे,ही कृती निवारणवादी आपत्तीशी काही अंशाने तरी विसंगत होईल. कारण, इतरांना गुन्हयांपासून परावृत्त करणे हे जर शिक्षेचे कार्य म्हटले तर क्षमाशीलता पत्करल्यावर ते काम होणार नाही. मात्र क्षमा ही शासकाच्या दुर्बलतेचे चिन्ह असता कामा नये. गुन्हेगाराने अपराध केल्यामुळे जो काही नैतिक उणेपणा जगात निर्माण झाला असेल त्याची भरपाई अपराध्यास झालेल्या दंडामुळे जशी होईल तशी

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

त्याच्या चित्तशुध्दीमुळेही होईल. जगाची नैतिक प्रकृती तेवढयापुरती तरी साम्यावस्थेत येईल. या प्रकारच्या क्षमाशीलतेत उपराध्यास पश्चात्ताप होणे व त्याद्वारा त्याची चित्तशुध्दी होणे या गोष्टी अपेक्षित आहेत.



Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner